तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचा उच्च माध्यमिक स्तराच्या विद्यार्थ्यांमधील उपयोगितेचा अभ्यास

शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत **विद्यावाचस्पती** पदवीच्या

अंशतः पूर्तीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास

सादर केलेला **संशोधन आराखडा**

संशोधक

किर्तीराज चंद्रभानजी लोणारे

मार्गदर्शिका

प्रा. डॉ. संघमित्रा गोणारकर

एम.ए.(इतिहास), एम.एड.,पीच.डी.,सेट (शिक्षणशास्त्र)

प्राचार्या

सावित्रीबाई फुले महिला अध्यापक महाविद्यालय,

वसरणी, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२०१६

अनुक्रमणिका

अ.क्र.	मुद्दे	पृष्ठ क्रमांक
१	समस्या विधान	३
२	प्रस्तावना	३
३	संबंधित साहित्याचा आढावा	४–५
४	संशोधनाची उद्दिष्ट्ये व गृहितके, परिकल्पना	६–७
५	संशोधनाची पद्धती	७
६	संशोधनाचे महत्त्व – आंतरराष्ट्रीय, – राष्ट्रीय, – प्रादेशिक. – संशोधनाची व्याप्ती	९
७	कार्यनिती आराखडा –प्रकरण योजनेसह	१५
८	कार्याचे नियोजन	१६
९	इतर बाह्य बाबी	१७
१०	संदर्भ साहित्य सूची	१७–१८

(Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded Ordinances for Ph.D. Degree) नुसार)

तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचा उच्च माध्यमिक स्तराच्या विद्यार्थ्यांमधील उपयोगितेचा अभ्यास

प्रस्तावना :

मानव हा पृथ्वीतलावरील सर्वात उत्क्रांत प्राणी आहे. त्याच्या शारीरिक गरजांबरोबर मनाच्या गरजा भागणे, मन संपन्न व समर्थ होणे तितकेच आवश्यक आहे. जीवनमूल्यांच्या संस्कारातून मन विकसित होते. जीवनमूल्ये मानवी जीवनाला अर्थ देतात तसेच समाज व राष्ट्राचेही कल्याण साधतात. त्यामुळे भारतीय शिक्षणात मूल्यशिक्षणाला महत्वाचे स्थान दिलेले आहे. इ.स. १९९७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाने मूल्यशिक्षण औपचारिकरीत्या शालेय स्तरावर सुरू करण्याचा निर्णय घेतला. मानवी व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास हे शिक्षणाचे ध्येय आहे. व्यक्तिमत्त्वाची शारीरिक, मानसिक, भावनिक व आध्यात्मिक अशी विविध अंगे आहेत. त्यांच्या विकासाचा विचार करतांना मूल्यशिक्षण अपरिहार्य आहे. मूल्यशिक्षण ही आजकाल सुरू झालेली बाब नसून ती प्राचीन काळापासून आपणांवर रूजविण्यासाठी अनेक संत महन्तांनी प्रयत्न केलेले आहेत. हे तत्त्वज्ञान म्हणजे शिकवण आहे. म्हणून या तत्त्वज्ञानाला ‘शैक्षणिक विचार’ असे म्हणता येईल. हे तत्त्वज्ञान अडीच हजार वर्षापूर्वी सिद्धार्थ गौतमाने बुद्धत्वाची प्राप्ती केल्यानंतर सारनाथ येथील प्रथम धम्मोपदेशापासून तर त्यांच्या महापरिनिर्वाणापर्यंत तब्बल ४५वर्षे अनेक ठिकाणी व अनेकांना तथागत बुद्धांनी उपदेशातून दिले. त्या मानवजातीच्या कल्याणकारी उपदेशांना ‘बुद्ध तत्त्वज्ञान’ असे म्हणतात. त्या उपदेशातील मूल्यशिक्षणासंबंधी जे उपदेश त्यांनी केले, तसेच तत्कालिन संपूर्ण जम्बुद्विपामधील समाजाला उपयुक्त ठरणारे मार्गदर्शन तथागत बुद्धांनी दिले जे तत्त्वज्ञान जगातील अनेक देशांनी स्विकारले आहे. व आज संपूर्ण जगामध्ये स्विकारले जात आहे. विविध ज्ञानशाखेमध्ये त्या तत्त्वज्ञानावर अभ्यास होत आहे. जीवनाच्या प्रत्येक शाखेविषयी, समस्येविषयी सखोल असे वैयक्तिक मार्गदर्शन तथागत बुद्धांच्या विचारात आढळते. समाजास बुद्धांनी सत्य, अहिंसा, अस्तेय, समता, परस्पर प्रेम, सहनशीलता, प्रयत्नवाद, ज्ञानाचे महत्व, शिस्त, सेवाभाव, अध्ययनशीलता, देशप्रेम, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, बंधुभाव व मानवता यांची शिकवण दिली. म्हणून या तत्त्वज्ञानाचे उपयोजन शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणून शिक्षणशास्त्र शाखेत प्रामुख्याने व्हावयास पाहिजे. या उद्देशाने प्रेरित होवून तथागत बुद्धांचे मानवतावादी मूल्यशिक्षण विषयक विचार सर्वांपर्यंत पोहचावे यासाठी

संशोधकाने सदरील विषय संशोधनासाठी घेतला आहे. आजच्या शिक्षणास योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य यातून नक्कीच पूर्णत्वास जाईल व शिक्षणशास्त्रास ज्ञानाचे नवे दालन उपलब्ध होईल यात शंका नाही. संशोधकाने या विषयावर खोलवर केलेला विचार, तसेच स्वत: संशोधकाची तथागत गौतम बुद्धांविषयी असलेली डोळस श्रद्धा व तथागत गौतम बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाविषयी संशोधन करण्याची तीव्र इच्छा तसेच आधुनिक काळातील बदलत्या जीवनशैलीमध्ये बुद्धांच्या मूल्यशिक्षणांची अत्यंत आवश्यकता व गरज लक्षात घेता या विषयावर संशोधन व्हावे. यादृष्टीने संशोधकाने हा विषय संशोधनासाठी घेण्याचे निश्चित केले आहे.

संबंधित साहित्याचा आढावा :

जोशी,भी.रं.,पोंक्षे,द.बा.व जोशी,भा.बी. (जाने.२००७). **शिक्षणशास्त्र**: पुणे,डायमंड पब्लिकेशन. या ग्रंथातून शिक्षणविषयक संकल्पना व शब्दांचे अर्थ समजून घेण्यास मदत झाली.

तगारे, ग.वा. (१९८२) **पाली साहित्याचा इतिहास**: नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, म.गांधी रोड साठी, रत्नाकर अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

या ग्रंथातून पाली साहित्याचा पूर्णपणे परिचय करून घेतला. तसेच अनेक ग्रंथांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली.

गोणारकर, संघमित्रा. (जाने–२००९). **बौद्ध शिक्षण प्रणाली**: नांदेड, निर्मल प्रकाशन.

या ग्रंथातून बौद्ध शिक्षणाविषयी अत्यंत महत्वपूर्ण माहिती मिळाली. तसेच बुद्धाच्या मूल्यशिक्षणविषयक असलेल्या कोणकोणत्या बाबी विद्यापीठात शिकविल्या जात असत याचीही माहिती मिळाली.

मुळावकर, संतोष, व मुळावकर कल्पना (२००५) **मूल्यशिक्षण:सुसंवाद**. नागपूर: विद्या प्रकाशन.

या ग्रंथातून मूल्यशिक्षणविषयक विविध दृष्टीकोन, विविध संज्ञाचे अर्थ तसेच उपयोजित मूल्यशिक्षण याची माहिती प्राप्त झाली. व प्रश्नावली तयार करण्यासाठी या ग्रंथाचा निश्चितच उपयोग होईल.

ढेकणे शहाजी–प्रकाशक (२०१२) **शिक्षणशास्त्र इ. ११ वी** म.रा.मा.व उ.मा.शि.मंडळ, पुणे.

या अभ्यासक्रमाच्या पुस्तकातून मूल्यांची गरज व महत्व समजून घेतले.

मुळे, रा.शं., उमाठे, वि.तु. (१९८७) **शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे.** नागपूर: साहित्य प्रसार केंद्र. या ग्रंथातून संशोधनाविषयी सखोल ज्ञान झाले. यामधून शैक्षणिक संशोधनाची पद्धती, गृहितके, नमुना निवड इत्यादी अनेक बाबींचे ज्ञान झाले.

साळुंखे, आ.ह. (फेब्रु.–२००९). **सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध** सातारा: लोकायत प्रकाशन.

या ग्रंथातून बुद्धाचे मूल्यविषयक उपदेश समजावून घेण्यासाठी उपयोग झाला.

गायकवाड, यादव (जुलै.–२००७). **बौद्ध धम्माची नवी फसल** औरंगाबाद: कैलाश पब्लिकेशन

या ग्रंथातून तथागत बुद्धाच्या मानवतावादी मूल्यशिक्षणविषयक अनेक बाबींचे ज्ञान झाले.

धम्मदूत मनिष आनंद (२००३) **बुद्ध मानस दर्शन** औरंगाबाद: धम्मदूत प्रकाशन.

या ग्रंथातून बुद्धाचे मानसशास्त्रीय तत्वज्ञान आणि मूल्यविषयक बाबी समजून घेतल्या.

आंबेडकर, डॉ. भिमराव रामजी, (२०००) **बुद्ध आणि त्यांचा धम्म** समता प्रकाशन, नागपूर

या ग्रंथातून बुद्धांनी सांगितलेले मानवतावादी सिद्धांत, तत्वज्ञान व सूत्रे समजून घेतली.

जगदिश काश्यप, (१९६०) **सुत्तपिटक– दीघनिकाय भाग १,२,३.** पालि पब्लिकेशन बोर्ड पटना.

या ग्रंथातून बुद्धांचे मूल्यविषयक उपदेशांचा सार समजून घेतला.

भदन्त तिस्सवंस. **विनयपिटक**– (२००६)

या ग्रंथातून बुद्धांचे मूल्यविषयक उपदेशांचा सार समजून घेतला.

जगदिश काश्यप. **अभिधम्मपिटक** पालि पब्लिकेशन बोर्ड पटना.

या ग्रंथातून बुद्धांचे मूल्यविषयक उपदेशांचा सार समजून घेतला.

कुंडले, म.बा. (२००३) **''शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र''** पुणे: श्री विद्या प्रकाशन.

समाजातील लोकांना मूल्यांचे संवर्धन व संक्रमण करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता असते. तसेच समाजातील लोक मूल्यांचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी काय करावे लागणार आहे याची दृष्टी वरील ग्रंथाच्या वाचनातून मिळाली.

बापट, भा.गो.(१९७५) **''शिक्षणातील संशोधन''** पुणे: नूतन प्रकाशन.

शिक्षणातील संशोधनविषयक अनेक बाबींचा उलगडा या ग्रंथातून झाला.

बेस्ट,जे.डब्ल्यु.,कॅहन,जे.व्ही.(१९७५ए.डी.)**''रिसर्च इन एज्युकेशन''**न्यू देहली:प्रेन्टिस हॉल ऑफ इंडिया.

या ग्रंथातून संशोधनाविषयी अनेक विषयांचा आढावा घेण्यासाठी उपयोग झाला.

डब्ल्यु.डब्ल्यु.डब्ल्यु. **थेसिस ऑफ द मन्थ**,एस.आर.टी.एम.यु.एन.एसी.इन.(वेबसाईट)या विद्यापीठाच्या वेबसाईडवरून प्रत्येक महिन्यात सादर होणारे प्रबंधाचे शीर्षक पाहण्यासाठी उपयोग झाला.

डब्ल्यु.डब्ल्यु.डब्ल्यु. **ज्ञानगंगा**, या वेबसाईडवरून विविध क्षेत्रातील संशोधनाची माहिती प्राप्त झाली.

डब्ल्यु.डब्ल्यु.डब्ल्यु. **ज्ञानगंगोत्री**,या वेबसाईडवरून विविध क्षेत्रातील संशोधनाची माहिती प्राप्त झाली.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

उपरोक्त विषयावर संशोधकाच्या दृष्टीसमोरील उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे —

१. तथागत बुद्धांचे मानवतावादी मूल्यशिक्षणविषयक विचार अभ्यासणे.

२. तथागत बुद्धांनी सांगितलेली जी मानवतावादी मूल्ये सद्यस्थितीतील इयत्ता १२वीच्या अभ्यासक्रमातील पालि भाषेच्या पुस्तकात समाविष्ट केलेली आहेत याचा शोध घेणे.

३. तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचा शिक्षणक्षेत्रास होणारा उपयोग अभ्यासणे.

४. बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमधील बुद्धाच्या मूल्यशिक्षणाची प्रासंगिकता अभ्यासणे.

५. वैश्विक जनतेचे नैतिक अध:पतन रोखण्यास बुद्धांचे मूल्यशिक्षणच उपयुक्त ठरणार आहे हे अभ्यासणे.

६. बुद्धांच्या मूल्यशिक्षणाचे शैक्षणिक उपयोजन तपासणे.

संशोधनाची गृहितके :

१. मानवतावादी मूल्यशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या व व्यक्तींच्या मनावर चांगला परिणाम होतो.

२. तथागत बुद्धांचे मानवतावादी मूल्यशिक्षण विश्वबंधूत्वासाठी उपयुक्त ठरणार आहे.

३. मानवतावादी मूल्य शिक्षणाचा प्रसार—प्रचार होणे ही काळाची गरज आहे.

परिकल्पना :

१. तथागत बुद्धांच्या जीवनचरित्रातून मानवतावादी मूल्य आढळून येतात.

२. तथागताचे मानवतावादी मूल्य सद्यस्थितीतील अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आल्याचे आढळून येते.

३. तथागत बुद्धांचे मानवतावादी विचार शिक्षणक्षेत्रास उपयुक्त ठरतात.

४. वैश्विक शांततेसाठी बुद्धाच्या मूल्यशिक्षणाची प्रासंगिकता आहे.

५. वैश्विक जनतेचे नैतिक अध:पतन रोखण्यास बुद्धांचे मूल्यशिक्षणच उपयुक्त ठरत आहे.

संशोधनाची पद्धती :—

<u>सर्व्हेक्षण पद्धती</u> :—

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने सर्व्हेक्षण पद्धती वापरली जाईल. संशोधनाच्या निष्कर्षासाठी संशोधक जिल्हा व तालुका स्तरावरील इयत्ता १२वी मध्ये पालि विषय असणारे उच्च माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालयांमधून तसेच मूल्यशिक्षण विषयक शाळा, महाविद्यालये, संस्था व तज्ज्ञ व्यक्तींना वैयक्तिक भेट देवून प्रश्नावली, मुलाखती व मतावली यांच्याद्वारे माहिती प्राप्त करणार आहे. पालि विषय शिकविणारे अध्यापक व शिकणारे विद्यार्थी यांचे सर्व्हेक्षण केले जाईल. मूल्यशिक्षणाची उपयोगिता तपासण्यासाठी सर्व्हेक्षण पद्धती वापरली जाईल.

<u>ऐतिहासिक पद्धती :—</u>

प्रस्तुत संशोधन हे तथागत बुद्धांच्या मूल्यशिक्षणासंबंधी असल्यामुळे ऐतिहासिक बाबींचा अभ्यास करावा लागणार असल्यामुळे, तसेच ऐतिहासिक दाखले व पुरावे यांचाही आधार घ्यावा लागणार असल्यामुळे ऐतिहासिक पद्धती सुद्धा उपयोगात आणली जाणार आहे.

त्याचप्रमाणे संशोधन करतांना ग्रंथालय, वाचनालय, जिल्हा व तालुका स्तरावरील मूल्यशिक्षण विषयक शाळा, महाविद्यालये, संस्था इत्यादींना वैयक्तिक भेट देवून संशोधक त्या संबंधित बाबींची माहिती संकलीत करील. त्याचप्रमाणे तथागत बुद्धांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या जीवनचरित्राशी संबंधित क्षेत्रांना भेटी देणार आहे.

हे संशोधन प्रामुख्याने त्रिपिटक साहित्य, पिटकेत्तर साहित्य, बौद्ध साहित्य, इतर ऐतिहासिक वाङ्मय व साहित्य, मूळ पाली ग्रंथ, मराठी, हिन्दी, इंग्रजी ग्रंथ तसेच इंटरनेटवरील उपलब्ध माहिती, वृत्तपत्रातील लेख इत्यादींचा आधारसामुग्री म्हणून उपयोग घेतला जाईल.

साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील साधनांचा अवलंब करण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोत –

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने निष्कर्ष संशोधनासाठी तथागत बुद्धांच्या जीवन चरित्राशी लिहीलेले तत्कालिन साहित्य, ग्रंथ– जसे तिपिटक साहित्य, तसेच इतर विविध तज्ज्ञांनी लिहीलेले बौद्ध साहित्य, ग्रंथ, शिलालेख शिल्पकला, चित्रकला हे प्राथमिक स्त्रोत म्हणून उपयोग केला जाईल.

दुय्यम स्त्रोत –

तथागत बुद्धांचे मानवतावादी मूल्यशिक्षणासंबंधीत प्रकाशित ग्रंथ, पुस्तके यांचा दुय्यम स्त्रोत म्हणून उपयोग केला जाईल.

प्रश्नावली–

तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणविषयक तत्वज्ञानाचा समाज जीवनावर, विद्यार्थ्यांवर नेमका कोणता परिणाम झाला व आजच्या परिस्थितीत बुद्धांच्या विचारांची उपयुक्तता अभ्यासण्यासाठी विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा प्रतिसाद प्रश्नावलीद्वारे संकलीत करण्यात येईल.

जनसंख्या :

बीड जिल्ह्यातील २७० उच्च माध्यमिक विद्यालय किंवा कनिष्ठ महाविद्यालयातील पालि भाषा अध्ययन करणारे इयत्ता १२ वीचे विद्यार्थी हे या संशोधनाची जनसंख्या असेल.

न्यादर्श :

बीड जिल्ह्यातील २७० उच्च माध्यमिक विद्यालय किंवा कनिष्ठ महाविद्यालयापैकी २७ कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता १२ वी चे २५० विद्यार्थी हे या संशोधनाचा न्यादर्श असेल.

न्यादर्श निवडीची पद्धत :

बीड जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयीन किंवा कनिष्ठ महाविद्यालयांच्या नावांच्या चिठ्ठया तयार करून त्यापैकी २७ चिठ्ठया लॉटरी पद्धतीने उचलून बाजुला काढल्या जातील. या २७ चिठ्ठयामधील जे उच्च माध्यमिक विद्यालय अथवा कनिष्ठ महाविद्यालय असतील त्यामधील २५० विद्यार्थी लॉटरी पद्धतीने नमुना म्हणून निवड केली जाईल.

निष्कर्षाचे तंत्र :

१. प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने संकलित केलेल्या तात्त्विक माहितीचा अन्वयार्थ लावतांना आंतरिक मीमांसा व बाह्य मीमांसा करून निष्कर्ष काढले जातील.

२. संख्यात्मक प्रदत्तांचे विश्लेषण करण्यासाठी आवश्यकता पडल्यास काय स्केअर, या सांख्यिकी तंत्रांचा वापर करण्यात येईल. त्यांची सविस्तर व गुणात्मक माहिती विविध सारणीद्वारे दर्शविण्यात येईल.

संशोधनाचे महत्त्व :

प्राचीन काळापासून ते आजतागायत विविध धर्मांचे, पंथांचे तत्त्वज्ञान शिक्षण क्षेत्राला दिशा देण्याचे कार्य करीत आले आहेत. तथागत बुद्धांचे मानवतावादी मूल्यशिक्षण हे तत्कालिन परिस्थीतीत उपयुक्त ठरले होते. व उत्तरोत्तर हे मूल्यशिक्षण समाजमान्य झाले. व त्यातूनच मानवतावादी समाजाची निर्मिती झाली. आजच्या समाजात सुद्धा बुद्धविचारांची गरज लक्षात घेता व त्या मूल्यशिक्षणाचे उपयोजन आधुनिक शिक्षण क्षेत्रात करून घेण्याच्या उद्देशाने व शिक्षण क्षेत्रास एक महत्त्वपूर्ण योगदान देण्याच्या उद्देशाने तसेच शिक्षण, समाज व राष्ट्रहितास पोषक ज्ञानवृद्धीसाठी या संशोधनाचे फार महत्त्व आहे. यावरून या संशोधन विषयाची मौलिकता दिसून येते.

<u>आंतरराष्ट्रीय महत्व –</u>

१. या चिकित्सक शोध अभ्यासामुळे मानवतावादी मूल्यांची ओळख जगास होईल.

२. आंतरराष्ट्रीय पातळीवरील ज्या समस्या मानवांस भेडसावत आहेत त्या मानवा–मानवातील अमानवीय दृष्टीकोनामुळे आहेत. विचारापेक्षा मानसिक विकार धारण केल्यामुळे आहेत. या बाबींची जाण मानवास या संशोधनामुळे होईल. कारण शुद्ध विचाराने मानवतावादी मूल्ये जोपासली जातात. या सर्वाची माहिती होईल.

३. जगभरातील लोकांना शांततेची गरज वाटू लागलेली आहे. व जागतिक शांततेसाठी प्रत्येक व्यक्तीमध्ये मूल्य रूजविण्याची गरज आहे. बुद्धांनी दिलेले मानवतावादी मूल्यांची ओळख त्या सर्वांना झाल्यास जागतिक शांतता प्रस्थापित होईल.

राष्ट्रीय महत्व –

१. भारतीय शासनपद्धतीत संविधानातील लोकशाही मूल्यांनुसार राज्यकारभार चालतो. परंतु निवडून गेलेले सदस्य यांना मूल्यांची जपणूक कशी करावी, मूल्यरक्षण कसे करावे याची परिपूर्ण जाणीव नसेल तर अनेक समस्या निर्माण होतात. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण घेतांनाच जर मानवतावादी मूल्य संवर्धनाची जाणीव निर्माण केली तर पुढे ते देशाचे नेतृत्व प्रभावीपणे करू शकतील.

२. सद्यस्थितीत होणारे आतंकवादी हल्ले हे देशावरील फार मोठे आव्हान असून हल्लेखोर हे मानसिक गुलामीमुळे व विकृत प्रवृत्तीमुळे तसे करीत असतात असे माझे स्पष्ट मत आहे. म्हणून देशातील तरूणांमध्ये बुद्धांचे मानवतावादी मूल्य शिक्षण रूजविल्यास या समस्येवरील उपाययोजना करता येईल.

३. प्राचीन काळात भारतात तथागत बुद्धाचे मानवतावादी मूल्यशिक्षण विषयक विचार व तत्त्वज्ञान हे मानवतावादी मूल्य जोपासणारे होते ते आजही उपयुक्त ठरत आहे.

४. आधुनिक काळात जीवन जगण्यासाठी तथागत बुद्धाचे मूल्यशिक्षण विषयक तत्त्वज्ञान उपयुक्त ठरते, ते समजून येईल.

५. मूल्यशिक्षण देणाऱ्या संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये याचाही थोडक्यात आढावा घेण्यात येईल.

६. मानवतावादी मूल्यरक्षणासाठी प्रयत्न करणारे व्यक्ती आपोआपच तथागत बुद्धाचे विचार आत्मसात करतात हे स्पष्ट होण्यास मदत होईल.

<u>प्रादेशिक महत्व –</u>

१. प्रादेशिकदृष्ट्या विचार करता महाराष्ट्रात बुद्धांच्या विचारांमुळे प्राचीन काळापासूनच अनेक शिल्पकलांच्या माध्यमातून त्यांचे मूल्य लोकांपर्यंत पोहोचविण्याकरीता प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. परंतु काही दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांमुळे समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या असून मूल्य संवर्धन होण्याची गरज निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये तथागताच्या मानवतावादी मूल्य शिक्षणामुळे प्रादेशिक सुसंवाद निर्माण होऊन मानवी कल्याण साधता येईल.

वरीलप्रमाणे या शोध अभ्यासाचे महत्त्व प्रतिपादन करता येईल.

शोध अभ्यासाची गरज :

''मानवी मूल्यांचे बीजारोपन करणे हे शिक्षणाचे अंतीम व चिरकालीन ध्येय असते. ही मूल्ये बालकांमध्ये रूजविली नाहीत तर असंख्य गंभीर परिणाम त्यांच्यावर होतात. आज विज्ञान–तंत्रज्ञानाची घोडदौड, भौतिकदृष्ट्या जग जवळ येणे, जागतिकीकरण, भिन्न–भिन्न संस्कृतींचा वेगाने संपर्क आंतरक्रिया व संघर्ष, प्रगत विज्ञान–तंत्रज्ञानाने जग सुखी बनेल अशी काही निरीक्षकांची धारणा, वाढलेली सुखासीन वृत्ती, कुटुंबसंस्थेचे विघटन, मानवतेचा अभाव इत्यादी कारणांमुळे सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक मूल्यांचा वेगाने ऱ्हास होताना दिसत आहे. भ्रष्टाचार, काळाबाजार, रानटीपणा, स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा वृत्ती इत्यादी दुरिते वेगाने वाढताना दिसतात. एकंदर समाजजीवन आनंदयात्रेऐवजी अंधारयुगाकडे चाललेले आहे, समाजाला कीड लागलेली आहे. काही लोक तर समाजाला गुप्त कॅन्सर झालाय असे म्हणत आहेत. ही जरी अतिशयोक्ती वाटत असली आणि समाजात काही ठिकाणी जरी मायेची थोडीफार हिरवळ दिसत असली तरी एकूण समाजजीवन दूषित होऊ लागले आहे हे मान्य करावे लागते. पुन्हा हा समाज खऱ्याअर्थाने 'मानवी समाज' करावयाचा असेल तर त्यावर 'मूल्यशिक्षण' हा एकमेव उपाय आहे. मूल्यशिक्षणाकडे दूर्लक्ष झाल्यास समाजाचे, देशाचे काय होते याविषयी फ्रेडरिक लिल्जने आपल्या 'द एब्युज ऑफ लर्निंग' या ग्रंथात सुशिक्षीत जर्मनी नाझी राजवटीला का थोपवू शकला नाही, याची कारणमीमांसा करताना म्हटले आहे की, 'संपूर्ण १९व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासाकडेच जर्मनीने पूर्ण लक्ष दिले. शिक्षणात सर्व भर यावरच देण्यात आला. मूल्यशिक्षण दूर सारण्यात आले. विज्ञान–तंत्रज्ञानातील विशेषज्ञच निर्माण झाले. समाजाशी बांधिलकी, समाजाच्या समस्या, जगताबद्दलचा भाव या गोष्टी

पूर्ण विसरल्या गेल्या आणि परिणामी नाझीचा उदय व भरभराट झाली. शेवटी जर्मनीचा अस्त झाला. 'मॅन विदाऊट व्हॅल्यू' या ग्रंथात एरिच कहलरने– 'मूल्यशिक्षणाकडे दुर्लक्ष करून केवळ विज्ञान–तंत्रज्ञानाकडे, व्यावसायिक शिक्षणाकडे पूर्ण लक्ष दिल्यास कोणते गंभीर परिणाम होतात' हे दाखवून दिले आहे.

मूल्यशिक्षणाद्वारे मानवी अंतर्यामातील 'बंधुता' स्वत:ची सद्सद्बुद्धी तेवत ठेवली तरच सुदृढ समाज निर्माण होऊ शकेल. त्यातच व्यक्तीचे हितही दडलेले असते. 'व्यक्तींचा समाज आणि समाजाची व्यक्ती' ही जाणीव मूल्यशिक्षणातूनच निर्माण होते. यातून 'हे विश्वची माझे घर', या विश्वातील प्रत्येक मनुष्यप्राण्यांवर मैत्री करा हा तथागत बुद्धांचा संदेश मूळ धरू लागतो. हे परिपूर्ण होण्यासाठी मूल्यशिक्षणाची गरज आहे.''[१]

मूल्यशिक्षणातून नैतिक विकास, लोकशाही तत्त्वांची पेरणी, सहकार्ययुक्त जीवन, संघर्ष–विराम, व्यापक दृष्टी, सामाजिक सुसंवाद, सभ्यता विकास, स्वप्रकटीकरण, स्वसाक्षात्कार आणि मानवतावाद निर्मिती शक्य होणार आहे. त्यामुळे या तत्त्वज्ञानातील **''तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचा उच्च माध्यमिक स्तराच्या विद्यार्थ्यांमधील उपयोगितेचा अभ्यास ''** हा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक संशोधकाने शोध अभ्यासासाठी हाती घेतलेला आहे.

संशोधनाचे शीर्षक :

''तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचा उच्च माध्यमिक स्तराच्या विद्यार्थ्यांमधील उपयोगितेचा अभ्यास ''

संकल्पनांच्या कार्यात्मक व्याख्या :

तथागत बुद्ध :

''ज्या व्यक्तीने सम्यक् संबोधी प्राप्त केली–ती व्यक्ती.'' येथे इ.स.पू. ५६३ ते इ.स.पू ४८३ या कालखंडातील शुद्धोदनपुत्र सिद्धार्थ गौतम अर्थात तथागत गौतम बुद्ध.[२]

मानवतावाद :

''माणसाने माणसांशी माणसाप्रमाणे वागावे यालाच मानवतावाद म्हणतात.''[३]

'श्रद्धेच्या शृंखलांपासून विवेकबुद्धीची मुक्तता आणि प्रत्यक्ष परिस्थितीचा परीक्षणातून अभ्यास.'
'अनेक सद्‌गुणांचा एकात्म समुच्चय म्हणजे मानवता होय.'[४]

मूल्यशिक्षण:

''व्यक्तिमत्व विकासाला पोषक ठरणाऱ्या स्वमान्य, समाजमान्य, स्थलकालनिरपेक्ष, विकसनशील, सुसंघटीत अशा मार्गदर्शक तत्त्वांचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण.''[४]
''मानवी समाजातील 'सत्'ची निर्मिती म्हणजे मूल्य.''[५] ''ज्या गुणांमुळे, तत्त्वांमुळे व्यक्ती, समाज आणि विश्व ह्यामध्ये परस्पर सुसंवाद साधून सर्वांचा विकास होतो अशा तत्त्वांचे शिक्षण म्हणजेच मूल्यशिक्षण.'' ''आपला समाज हा खऱ्याअर्थाने 'मानवी समाज' करावयाचा असेल तर जे शिक्षण उपयोगी पडते, ते शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय.'' ''व्यक्ती व समाजही जपण्यासाठी जे शिक्षण कामी येते त्यालाच मूल्यशिक्षण म्हणतात.'' येथे तथागत बुद्धांचे मानवतावादी मूल्यशिक्षण.

उच्च माध्यमिक स्तर:

१०+२+३ या शैक्षणिक आकृतीबंधातील +२ हा स्तर. अर्थात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाचे इयत्ता १०वी नंतरचा १२वी वर्गाचे शिक्षण.

उपयोगिता :

मानवाच्या कल्याणासाठी, विकासासाठी, प्रगल्भतेसाठी फायदेशीर ठरणारी, उपयोगी पडणारी बाब.

चिकित्सक अभ्यास :

एखाद्या विषयाचा सर्व अंगांनी अभ्यास करणे, अथवा विषयाची प्रत्येक बाजू समजून घेणे कोणताही पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन न बाळगता सर्वांगाने बारिक–सारिक बाबींचे स्पष्ट विश्लेषणात्मक व वैज्ञानिक दृष्टीने केलेले अध्ययन म्हणजे चिकित्सक अभ्यास.

संशोधनाची व्याप्ती :

क्षेत्र व्याप्ती :— सदरील संशोधनाची क्षेत्रव्याप्ती 'बीड जिल्ह्यातील इयत्ता १२वीच्या विद्यार्थ्यांच्या पालि या विषयापुरती' आहे.

आशयव्याप्ती :—प्रस्तुत संशोधनातील आशयव्याप्ती तथागत बुद्धाच्या मानवतावादी विचारांशी, तत्वज्ञानाशी व मूल्यांशी निगडीत राहील. तसेच बुद्धांचे जीवनचरित्र, शिक्षणविषयक विचार हे सद्यस्थितीत कसे उपयोगात आणता येतील या बाबींशी संबंधित असेल. इयत्ता १२वीच्या पालि या विषयातील आशयापुरते व्याप्त असेल.

विषयव्याप्ती :—प्रस्तुत संशोधनातील विषयक्षेत्र तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणासंबधी असेल. तसेच १२वीच्या पालि या विषयापुरते व्याप्त असेल.

प्रदत्त व्याप्ती :— प्रस्तुत संशोधनाची प्रदत्त व्याप्ती प्राथमिक व दुय्यम स्त्रोताद्वारे उपलब्ध होणाऱ्या प्रदत्ताशी संबंधित असेल.

मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे असतील.

क्षेत्र मर्यादा :—

सदरील संशोधनाची क्षेत्रमर्यादा 'बीड जिल्ह्यातील इयत्ता १२वीच्या विद्यार्थ्यांच्या पालि या विषयापुरती' आहे.

आशयमर्यादा :—

प्रस्तुत संशोधनातील आशयमर्यादा तथागत बुद्धाच्या मानवतावादी विचारांशी, तत्वज्ञानाशी व मूल्यांशी निगडीत राहील. तसेच बुद्धांचे जीवनचरित्र, शिक्षणविषयक विचार हे सद्यस्थितीत कसे उपयोगात आणता येतील या बाबींशी संबंधित असेल. इयत्ता १२वीच्या पालि या विषयातील आशयापुरते मर्यादित असेल.

विषयमर्यादा :—

प्रस्तुत संशोधनाचे विषयक्षेत्र तथागतबुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणासंबधी असेल. व इयत्ता १२वीच्या पालि या विषयापुरते मर्यादित असेल.

प्रदत्त मर्यादा :— प्रस्तुत संशोधनाची प्रदत्त मर्यादा प्राथमिक व दुय्यम स्त्रोताद्वारे उपलब्ध होणाऱ्या प्रदत्ताशी संबंधित असेल.

कालावधी मर्यादा–

सदरील संशोधन कार्य हे शैक्षणिक वर्ष २०१७–२०१९ या कालावधीत पूर्ण केले जाईल.

कार्यवाहीचे टप्पे :

१. **संदर्भ साहित्याचा अभ्यास–**

तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणावर प्रकाश टाकण्यासाठी अनेक ग्रंथांचा, संदर्भ साहित्याचा तसेच माध्यमांचा उपयोग केला जाईल.

२. **गतसंशोधनाचा आढावा :**

उपरोक्त विषयासंबंधी संशोधन करण्याच्या उद्देशाने संशोधकाने विविध संशोधन प्रबंध, प्रबंधिका, संशोधन पुस्तिका, संशोधन सारांश, इंटरनेटवरील वेबसाईट यांच्याद्वारे या विषयासंबंधी आढावा घेतला जाईल.

३. **प्रश्नावली संकलन:**

बीड जिल्ह्यातील इयत्ता १२ वीच्या पालि या विषयाचे अध्यापनकार्य करणाऱ्या उच्च माध्यमिक किवा कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देवून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाईल. काही तज्ज्ञांचे मार्गदर्शन व प्रश्नावली संकलित केली जाईल.

४. **बुद्धाच्या तत्वज्ञानविषयक ग्रंथांतून मूल्यांचा अभ्यास:**

तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणविषयक माहिती असणाऱ्या ग्रंथांतील महत्वांच्या बाबींचा सखोल व चिंतनात्मक अभ्यास करून त्यातील महत्वपूर्ण तत्त्वे, सिद्धान्त हे आधुनिक अभ्यासक्रमास उपयुक्त कसे ठरतात याचा अभ्यास केला जाईल.

५. **विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

माहिती संकलन केल्यानंतर ती माहिती तक्त्यांमध्ये मांडून त्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल.

६. **निष्कर्ष :**

प्राप्त माहितीच्या आधारे केलेल्या विश्लेषणावरून निष्कर्ष काढले जातील.

७. **शिफारसी :**

निष्कर्षावरून शैक्षणिक आयोगास, तज्ज्ञांस व शिक्षण विभागास शिफारसी सुचविल्या जातील.

८. **सारांश लेखन :**

वरील सर्व बाबींचे सारांश लेखन केले जाईल.

९. **पुढील संशोधनासाठी विषय :**

पुढील संशोधनासाठी विषय सुचविले जातील.

प्रकरण योजना :

१. **प्रस्तावना**

२. **संबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा**

३. **संशोधनाची कार्यपद्धती**

४. **माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

५. **निष्कर्ष व शिफारशी**

वेळापत्रक :

संशोधन कार्यासाठी वेळापत्रक खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेले आहे.

अ.क्र.	**विवरण**	**कालावधी**
१.	संबंधित साहित्याचा अभ्यास	६ महिने
२.	संशोधन साधनांचे संकलन	६ महिने
३.	माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ	६ महिने
४.	संशोधन अहवाल लेखन	६ महिने
५.	प्रबंध छपाई, बांधणी व इतर कार्य	६ महिने
	एकूण कालावधी	**३० महिने**

(टीप : संशोधनकार्याच्या स्वरूपावरून कालावधीमध्ये बदल होवू शकतो.)

खर्चाचे अंदाजपत्रक :

संशोधन कार्यासाठी खर्चाचे अंदाजपत्रक खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेले आहे.

अ.क्र.	विवरण	अंदाजित खर्च (रूपयात)
१.	बीड जिल्ह्यातील २७ उच्च माध्यमिक विद्यालय किवा कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देणे. व इतर प्रवासखर्च	२५,०००/—
२.	भ्रमणध्वनी, प्रिंटर, झेरॉक्सपेपर इ. सामग्री खरेदी	२५,०००/—
३.	संगणकावर पीपीटी तयार करणे	५,०००/—
४.	संबंधित साहित्य, ग्रंथ खरेदी, कार्यशाळा व चर्चासत्र	२०,०००/—
५.	प्रबंध डीटीपी, बायंडींग व सादरीकरण	१०,०००/—
	एकूण खर्च	**८५,०००/—**

(टीप : संशोधनकार्याच्या स्वरूपावरून खर्चामध्ये बदल होवू शकतो.)

संदर्भ साहित्य सूची :

१. जोशी,भी.रं.,पोंक्षे,द.बा.व जोशी,भा.बी. (जाने.२००७). **शिक्षणशास्त्र**: पुणे,डायमंड पब्लिकेशन. पृ. ५१२.

२. तगारे, ग.वा. (१९८२) **पाली साहित्याचा इतिहास**: नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, म.गांधी रोड साठी, रत्नाकर अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. ३६ व ४२.

३. गोणारकर, संघमित्रा.(जाने—२००९). **बौद्ध शिक्षण प्रणाली**:नांदेड, निर्मल प्रकाशन. पृ. ५३.

४. मुळावकर, संतोष, व मुळावकर कल्पना (२००५) **मूल्यशिक्षण:सुसंवाद**. नागपूर: विद्या प्रकाशन. पृ.८४,८७.

५. ढेकणे शहाजी—प्रकाशक (२०१२) **शिक्षणशास्त्र इ. ११ वी** म.रा.मा.व उ.मा.शि.मंडळ, पुणे. पृ. ५८

५. मुळे, रा.शं., उमाठे, वि.तु. (१९८७) **शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे.** नागपूर: साहित्य प्रसार केंद्र. पृ.

६. साळुंखे, आ.ह. (फेब्रु.—२००९). **सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध** सातारा: लोकायत प्रकाशन.

७. गायकवाड, यादव (जुलै.—२००७). **बौद्ध धम्माची नवी फसल** औरंगाबाद: कैलाश पब्लिकेशन

८. धम्मदूत मनिष आनंद (२००३) **बुद्ध मानस दर्शन** औरंगाबाद: धम्मदूत प्रकाशन.

९. आंबेडकर, डॉ. भिमराव रामजी, (२०००)**बुद्ध आणि त्यांचा धम्म** समता प्रकाशन, नागपूर

१०. जगदिश काश्यप,(१९६०)**सुत्तपिटक–दीघनिकाय भाग १,२,३.** पालि पब्लि. बोर्ड पटना.

११. **विनयपिटक**– (२००६) भदन्त तिस्सवंस.

१२. **अभिधम्मपिटक** – जगदिश काश्यप. पालि पब्लिकेशन बोर्ड पटना.

१३. कुंडले, म.बा. (२००३) **''शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र''** पुणे: श्री विद्या प्रकाशन.

१४. बापट, भा.गो.(१९७५) **''शिक्षणातील संशोधन''** पुणे: नूतन प्रकाशन.

१५. बेस्ट,जे.डब्ल्यु.,कॅहन,जे.व्ही.(१९७५ए.डी.)**''रिसर्च इन एज्युकेशन''**न्यू देहली:प्रेन्टिस हॉल ऑफ इंडिया.

१८. डब्ल्यु.डब्ल्यु.डब्ल्यु. **थेसिस ऑफ द मन्थ**, एस.आर.टी.एम.यु.एन.एसी.इन.(वेबसाईट)

१९. डब्ल्यु.डब्ल्यु.डब्ल्यु. **ज्ञानगंगा** वेबसाईट

२०. डब्ल्यु.डब्ल्यु.डब्ल्यु. **ज्ञानगंगोत्री** वेबसाईट

संशोधक	मार्गदर्शिका
किर्तीराज चंद्रभानजी लोणारे	**प्रा. डॉ. संघमित्रा गोणारकर**
एम.ए., (पालि) नेट. एम.एड्. सेट,नेट.	एम.ए.(इतिहास),एम.एड्.,पीच.डी.,सेट (शिक्षणशास्त्र)
(क.म.शि.) **संभाजीराव बडगिरे**	प्राचार्या
उच्च माध्यमिक विद्यालय, ममदापूर,	**सावित्रीबाई फुले महिला अध्यापक महाविद्यालय,**
ता. अंबाजोबाई, जि.बीड.	वसरणी, नांदेड.

स्थळ : स्वारातीमवि. नांदेड.

दिनांक : १२/०५/२०१७ .